|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव-४२५ ००१.

एम. फिल. सुटीतील अभ्यासवर्ग.

कार्यपध्दतीसंबंधी टिपण.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने मे, १९९२ पासून सुटीतील एम. फिल. अभ्यासवर्ग सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. मा. कुलगुरुंनी या संदर्भात निर्गमित केलेल्या आदेशानुसार [संदर्भ क्र. एन. एम. यु/९२/६-ई/१५/३११३ दि. ३. ४. ९२] या अभ्यासवर्गाच्या संयोजनासाठी डॉ. के. आर. सोनवणे [विज्ञान विद्याशाखा] डॉ. र. ना. वरखेडे [कला विद्याशाखा] डॉ. एस. आर. चिरमाडे [वाणिज्य व मानव्य विद्याशाखा] यांची त्या त्या विद्याशाखेचे संयोजक [Co-ordinator ] म्हणून नियुक्ती केली आहे, तसेच डॉ. के. आर. सोनवणे हे सर्व विद्याशाखांच्या एम. फिल. अभ्यास कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक म्हणून काम पाहाणार आहेत.

एम. फिल. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी पुणे विद्यापीठ व विद्यापीठ अनुदान मंडळाच्या वेळोवेळी निघालेल्या परिपत्रकांच्या व निर्णयांच्या आधारे पुढील पथदर्शक नियमावली व कार्यप्रणाली नक्की करण्यात येत आहे.

०१. किमान पाच विद्यार्थी असतील तरच त्या त्या विषयासाठी सुटीतील अभ्यासवर्ग घेतले जातील. प्रत्येक विषयासाठी दरवर्षी पंधराहून अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जाणार नाहीत.

०२. सध्या सेवेत/नोकरीत असलेल्या उमेदवारांना सुटीतील एम. फिल. अभ्यासवर्गात प्रवेश देण्यात येईल. त्यामुळे संबंधित उमेदवाराने आपापल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे "नाहरकत प्रमाणपत्र" प्रवेशापूर्वी सादर करणे आवश्यक राहील.

०३. दोन तासांची प्रवेश परीक्षा घेतली जाईल. या प्रवेश परीक्षेत समाधानकारक गुणवत्ता सिध्द करणा-या उमेदवारांना गुणानुक्रमांच्या प्राधान्यक्रमाने प्रवेश दिला जाईल. प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर गुणवत्तायादी तयार करण्यात येईल. व पुढील प्राधान्यक्रमाने प्रवेश देण्यात येतील.

[१] उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ क्षेत्रातील वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक.

[२] उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ क्षेत्रातील वरिष्ठ महाविद्यालयांशी संलग्न असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक.

[३] अन्य विद्यापीठांतील वरिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षक.

[४] अन्य विद्यापीठ क्षेत्रातील वरिष्ठ महाविद्यालयांशी संलग्न असलेल्या कनिष्ठ कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक.

०४. अभ्यासक्रम एकंदर तीन सत्रात शिकविला जाईल. एका अभ्यासक्रमासाठी [कोर्स] किमान ८० घड्याळी तास अध्यापन केले जाईल. म्हणजेच तीन प्रश्नपत्रिकांसाठी एकूण २४० तासिकांचे अध्यापन अपेक्षित आहे. तसेच दर प्रश्नपत्रिकेसाठी किमान दोन या प्रमाणे एकूण ६ परिसंवाद होतील. परिसंवाद संबंधित अभ्यासविषयाच्या निबंधाच्या आधारे होईल.

०५. कोणत्या सुटीत कोणता अभ्यासक्रम शिकविण्यात येईल व त्याचे वेळापत्रक कसे राहील हे त्या त्या विद्याशाखेचे संयोजक अध्यापकांची उपलब्धी व तत्संबंधीच्या सुविधांची उपलब्धी लक्षात घेऊन ठरवेल.

०६. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांस नियोजित अभ्यासकेंद्रात त्यांना देण्यात येणा-या वेळापत्रकाप्रमाणे पूर्ण वेळ हजर राहाणे बंधनकारक असेल.

... २ ..

०७. विद्यार्थ्यांकडून घेण्यात यावयाच्या शुल्काचा तपशील परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल.

०८. अ. प्रत्येक विद्यार्थ्याने दोन वर्षांच्या कालावधीत त्या त्या प्रश्नपत्रिकेशी संबंधित एक कृतिप्रकल्प [ assignment ] पूर्ण करावा लागेल.

ब. दररोज सहा तास विद्यार्थ्यांना अभ्यासकेंद्रात रहावे लागेल. पैकी दोन तास अध्यापकांकडून अध्ययन, दोनतास ग्रंथालयात स्वयंअध्ययन, एक तास मार्गदर्शक शिक्षकांबरोबर संपर्क.

०९. मूल्यमापन हे श्रेणी पद्धतीनुसार करण्यात येईल. त्याचा तपशिल परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल.

१०. त्या त्या विषयाच्या अध्यापनासाठी व संशोधन मार्गदर्शनासाठी ३ ते १० अध्यापकांचे सहकार्य घेण्यात येईल.

११. अध्यापकांना अध्यापनासाठी दर तासाला रु.५०/- याप्रमाणे मानधन देण्यात येईल. बाहेरगावच्या अध्यापकांना विद्यापीठ नियमांप्रमाणे प्रवास-दैनिक भत्ता देण्यात येईल.

संयोजक व प्रमुख संयोजक यांचे मानधनाचा तपशील स्वतंत्रपणे ठरविण्यात येईल.

१२. मूल्यमापन प्रक्रियेतील मानधनाचे दर पुढीलप्रमाणे नक्की करण्यात येत आहेत.

प्रबंधिकेचे मूल्यमापन

| | |
|---|---|
| अंतर्गत परीक्षकाचे मानधन | रु. १२५=०० |
| बहिस्थ परीक्षकाचे मानधन | रु. १२५=०० |
| तोंडी परीक्षा-परीक्षकाचे मानधन | रु. ७५=०० |

याखेरीज बहिस्थ परीक्षकाला प्रत्यक्ष टपालखर्च देय राहील.

उत्तरपत्रिका तपासण्याचे मानधन

| | |
|---|---|
| प्राश्निकाचे मानधन - दर प्रश्नपत्रिकेस | रु. १००=०० |
| प्राश्निक प्रमुखाचे मानधन | रु. १००=०० |
| उत्तरपत्रिका तपासण्याचे मानधन किमान व दर उत्तरपत्रिकेस रु.१०/- याप्रमाणे. | रु. ३०=०० |

१३. ग्रंथालय, प्रयोगशाळा व तत्सम शैक्षणिक सामग्री विद्यापीठ त्वरित उपलब्ध करुन देईल.

१४. दैनंदिन प्रशासकीय खर्च व तत्सम व्यवस्थापनासाठी विद्यापीठाने त्या त्या विभागास/केंद्रास योग्य ते अर्थ साहाय्य करावे.

अध्यापकवर्ग कार्यविभागणी व शैक्षणिक संघटन

१५. ज्या अध्यापकांना संशोधन-मार्गदर्शक म्हणून विद्यापीठाची मान्यता आहे, अशा किमान तीन अध्यापकांचा व जास्तीत जास्त दहा मान्यताप्राप्त अध्यापकांचा समावेश प्रत्येक विषयांच्या अध्यापन व मार्गदर्शनासाठी केला जाईल.

१६. एक संशोधन मार्गदर्शक दोन ते तीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करेल. पुरेसे मार्गदर्शक उपलब्ध नसल्यास विशेष बाब म्हणून ही संख्या जास्तीत जास्त पाचपर्यंत वाढविता येईल.

१७. दैनंदिन अध्यापन, मूल्यमापनप्रक्रिया व इतर तत्संबंधीची कार्यवाही करण्याकरिता त्या त्या विद्याशाखेच्या संयोजकांच्या अध्यक्षतेखाली एक एम. फिल. समिती संघटित करण्यात येईल. तीत तीन ते आठ सदस्यांचा समावेश असेल. ही समिती एम. फिल. प्रवेशासंबंधी शिफारस करणे, संबंधित विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शकाची नियुक्ती करणे, विद्यार्थ्यांनी शोधनिबंधासाठी निवडलेल्या विषयास मान्यता देणे, अध्यापनाची व मूल्यमापन प्रक्रियेची कार्यविभागणी करणे, परिसंवाद-स्वाध्याय यांचे आयोजन करणे, बहिःस्थ परीक्षक मंडळाची शिफारस करणे, तोंडी परीक्षा घेणे, एकंदर मूल्यमापन लक्षात घेऊन संबंधित विद्यार्थ्यास एम. फिल. पदवी प्रदान करण्यासंबंधीचा अहवाल विद्यापीठास सादर करणे इ. कार्ये करील.

-x-x-x-x-x-x-x-x-x

डीबी./

NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON.

Evaluation:

(i) The evaluation of the candidate's course work and his perfe- performance at the seminars will be a continuous process.

(ii) The evaluation of the performance of the students in the M.Phil. course shall be done by the course in-charge.

(iii) The dissertation will be evaluated by the guide of the candidate and an external referee appointed by the University authorities on the recommendation of the M.Phil. Committee.

(iv) The evaluation of the final seminar and the viva-voce test will be done by a committee consisting of the following:

(a) a research guide to be nominated by the Head/Profeessor-in-charge of the University Department/Dean of the Faculty concerned from a panel of three senior research guides to be suggested by the dissertation Supervisor-Chairman.

(b) the dissertation supervisor:

(c) A member of the M.Phil. Committee to be appointed by the M.Phil Committee.

(v) The evaluation of candidates for the M.Phil. degree shall be done according to the following grading system:

| Letter Grade | Quality | Grade Points | Equivalent Numerical Scale (Out of 100) |
|---|---|---|---|
| O | Outstanding | 6 | 75-100 |
| A | Very Good | 5 | 60-74 |
| B | Good | 4 | 50-59 |
| C | Average | 3 | 43-49 |
| D | Below Average | 2 | 35-42 |
| E | Poor | 1 | 25-34 |
| F | Fail | 0 | 0-24 |

The Examiners will award only the Letter Grades:

(vi) The performance of the candidates will be evaluated under the following Heads of Passing. The weightage given to each Head of Passing and the maximum final grade-points are as below:

cont..2

| Heads of Passing | Weightage Factor | Maximum Final Grade Points* |
|---|---|---|
| Group I. | | |
| Course 1 | 2 | 12 |
| Course 2 | 2 | 12 |
| Course 3 | 2 | 12 |
| Group II | | |
| Dissertation | 4 | 24 |
| *Seminar | 1 | 6 |
| *Viva-Voce | 1 | 6 |
| | | 72 |

*Seminar and Viva-Voce will be based on the dissertation.

(vii) Evaluator of the various Heads of Passing will give letter grades for each Head. The Grade-points corresponding to these letter-grades will be multiplied by the weightage factor to obtain the total final grade-points for that Head.

(viii) Minimum final Grade points for Passing : To pass, a candidate should get the following minimum final grade-points:

| | Minimum Final Grade Points |
|---|---|
| Total | .. 36 |
| Group I | .. 16 |
| Group II | .. 18 |
| Course 1 | .. 4 |
| Course 2 | .. 4 |
| Course 3 | .. 4 |
| Dissertation | .. 12 |
| Seminar | .. 3 |
| Viva-voce | .. 3 |

(ix) In the case of Dissertation the average of the total final grade-points given both by the internal and the external referee shall be taken as the final score. If either of the referees awards a letter-grade D, E, or F to a dissertation, the candidate will be declared to have failed in the dissertation. He may resubmit the dissertation after suitable modification within a period of one year from the declaration of the first result. Only one resubmission of the dissertation is allowed.

(x) If the candidate has secured minimum final grade-points in all the Heads of Passing, then the final seminar and the viva-voce test will be arranged.

All interested persons can attend the seminar and the viva-voce test which will constitute the defence of the

cont.3

dissertation and they shall have the right to ask questions and participate in discussion on the dissertation. The Chairman appointed in the manner prescribed above will exerscise his discretion to allow or not to allow a question. However, the members of the audience at the defence shall have no right to express their opininon on the suitability or otherwise on the dissertation for the award of the M.Phil. Degree.

(xi) In the case of course work, a student who does not get the minimum final grade point (i.e.,4) will have to reapper for the examination in that course.

(xii) A student will have to give another seminar if he does not get the minimum grade-point (i.e.) 3 in the seminar.

(xiii) A student will have to reappear for viva-voce if he does not get the minimum grade- point (i.e.)3) in the viva-voce.

A student can repeat the seminar and viva-voce only once.

(xiv) Overall Grades : A candidate who is declared as passed, will be placed in Grade "O", "A", or "B" depending upon the total final grade-points he secures according to the following table:

| Overall Grade | Total Final Grade Points out of 72 |
|---|---|
| "O" (Outstanding) | 64 to 72 |
| "A" | 50 to 63 |
| "B" | 36 to 49 |

A candidate securing fewer than 36 final Grade-Points will be declared "Failed"

+X+X+X+X+X+X+X+

dbs./

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

<u>उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.</u>

## परिशिष्ट [१-अ]

## विद्यार्थ्यांकडून घ्यावयाच्या शुल्काचा तपशील.

रु./पै.

१. ५०=०० नोंदणी शुल्क [प्रवेश अर्ज करताना भरावे]

२. ३०००=०० शैक्षणिक शुल्क [दोन हप्त्यात भरण्यास अनुमती. पैकी पहिला हप्ता प्रवेश घेतांना].

३. २०=०० संगणक नोंदणी शुल्क.

४. ५०=०० विकासनिधी [पैकी रु. १०/- विद्यापीठास पाठवावेत, उरलेले संबंधित विभागाने/संयोजक केंद्राने विकास कार्यासाठी खर्च करावेत]

५. १०=०० वैद्यकीय तपासणीशुल्क.

६. २०=०० विद्यापीठ विद्यार्थी कल्याणनिधी.

७. २०=०० क्रीडा शुल्क.

८. १०=०० विद्यार्थी सहाय्यनिधी.

९. १००=०० अंतर्गत मूल्यमापन - परीक्षा शुल्क.

१०. २५०=०० परीक्षा शुल्क [शोधनिबंध सादर करतांना भरावयाचे]

११. ३०=०० पात्रता प्रमाणपत्र.

१२. १०००=०० प्रयोगशास्त्र शुल्क [विज्ञान विद्याशाखा]

१३. ४००=०० ग्रंथालय शुल्क.

१४. २००=०० ग्रंथालय अनामत.

* इतर शुल्काचा तपशील विद्यापीठाच्या नियम व संकेताप्रमाणे.